


# चांदोबा

मुलांसाठी लोकगीत


चार्वाक दिप्ता यांची चित्रे

कथाचे ३००एम थिंकबुक




चांदोबा गोल आणि जाडा

सांग मला हे कसं जमतं बुवा!




चांदोबा दिसतो जाड आणि गोल चेंडू

पण दिवसेंदिवस दिसतो अर्धप्रकाशित बशी जणू




रात्रभर तू बाहेर असतोस

तुझ्या मित्रांसोबत म्हणजेच ताऱ्यांसोबत बागडतोस



चांदोबा गोल आणि चमकदार दिसे

दिवस आला की जातोस कुठे



चंद्र खूप, खूप लांब आहे
आज तुम्ही चंद्रापर्यंत चालत जायचे ठरवले
आणि दररोज न थांबता रोज २० किलोमीटर
चाललात तर चंद्रावर पोहोचेपर्यंत तुम्ही तुमच्या
आजीइतके म्हातारे व्हाल!

म्हणूनच चंद्राची ही रहस्य जाणून घ्यायला
रॉकेटमध्ये बसून लोक चंद्रावर जातात
तुम्ही जर खूप खूप अभ्यास केला तर एके
दिवशी तुम्ही सुद्धा चंद्राबद्दल अनेक
नवनवीन गोष्टी शोधू शकाल.

तुम्ही शास्त्रज्ञ होऊ शकता. किंवा कवी.
किंवा चित्रकार.
तुम्हाला हवे ते तुम्ही होऊ

शकता. पण तुम्हाला आकाशात नेहमी
चंद्र दिसेल. आणि म्हणा, “आय लव्ह
यू चांदोबा!”

तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी चंद्र
नेहमीच आकाशात असणार आहे, हे
किती छान आहे ना!





## तुम्ही वाचण्यापूर्वी

### विचार करा

तुम्ही सूर्य आणि चंद्र रोज पाहता?

तारे आणि ढग पाहता? आणि त्यांच्याबद्दल तुम्हाला प्रश्न पडतात?



### विचारा! चर्चा करा!

कल्पना चावला ही अंतराळात प्रवास करणारी पहिली भारतीय महिला होती. लहान असताना तिला विमानाचे चित्र काढायला खूप आवडायचे.
तुम्हाला एके दिवशी अवकाशात किंवा चंद्रावर जायला आवडेल का?

## कृती करा

आपल्या आधी जे पृथ्वीवर राहत होते, त्यांनी आपल्याला या पृथ्वीची भेट दिली आहे. त्यांनी पृथ्वीची काळजी घेतली, जेणेकरून आपण तिच्या भेटीचा आनंद घेऊ शकू.
तुमचे पृथ्वीवर प्रेम आहे हे निसर्गाला सांगण्याची आता तुमची पाळी आहे. तुम्ही काय काय करू शकता?


### तमाशा म्हणते

तुम्ही शाळेत वृक्षारोपण करू शकता का हे तुमच्या शिक्षकांना किंवा प्राचार्यांना विचारा

तुम्हाला परवानगी मिळाली की तुम्ही त्या रोपाचं झाड होईपर्यंत त्याची काळजी घ्या.

मला कळवा! तुम्ही आणि तुमच्या मित्रांनी काय केले ते मला सांगा.
तुमचे ईमेल tamasha!@katha.org येथे पाठवा. किंवा तमाशा,
c/o कथा, ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, नवी दिल्ली ११० ०१७ या पत्त्यावर पत्र पाठवा.

तुमचा पक्का दोस्त,



गीता धर्मराजन यांना मुलांसाठी गोष्टी लिहायला आवडतात. टारगेट या मुलांच्या नियतकालिकाच्या आणि पेनिसिल्व्हेनिया विद्यापीठाच्या द पेनिसिल्व्हेनिया गॅझेट या नियतकालिकाच्या त्या संपादक होत्या. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना २०१२ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

चार्बाक दिप्ता हा ऑक्सफर्डचा माजी विद्यार्थी आणि पुरस्कार विजेता इलस्ट्रेटर, खाद्यप्रेमी आणि जगभ्रमंती करणारा आहे.

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." - **नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
- **चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
- **टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" - **पेपरटायगर्स**

गीता धर्मराजन आणि टीम कथा यांनी या लोकगीताचा मुलांसाठी इंग्लिश अनुवाद केला आहे.

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०२१
इंग्लिश अनुवाद कॉपीराइट © गीता धर्मराजन
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.


सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.




"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

ही सर्व आयएलआर पुस्तके इंडिगो सीरिजमध्ये मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा







































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

"गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख."
- द पायोनिअर

मुलांसाठी
कथाचे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
xxx